फाईल क्र. ३७४(२)/विद्युत/२०१८/१४-ब दिनांक - ०३ मे, २०१९

# महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८

**जाहिरात क्रमांक : २६/२०१८ व अधिसूचना क्रमांक-४५/२०१८**

## अंतिम निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता, विद्युत, गट-ब, श्रेणी-२ च्या एकूण ०३ पदांकरीता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८ चा अंतिम निकाल दिनांक ०३ मे, २०१९ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत **यवतमाळ** या जिल्हयातील **श्री. रामगडे घनश्याम प्रभाकर** (बैठक क्रमांक-**MB००१०२६**) हे राज्यातून व मागासवर्गीयातून प्रथम आले आहेत.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व पदनिहाय प्रत्येक वर्गवारीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (पूर्व) परीक्षा-२०१८ दिनांक ८ जुलै, २०१८ रोजी मुंबईसह अन्य इतर तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता २६७०८ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून मुख्य परीक्षेकरिता ५५ उमेदवार अर्हता प्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दिनांक २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी मुंबई जिल्हा केंद्रावर घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी ०९ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी झाल्या.

४. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

५. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक **३.८** पहावी.)

**उपसचिव (परीक्षा-१)**

**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**